**प्रेस नोट** **दि.१४/०३/२०१९**

**कोरेगाव पार्क पो.स्टे.पुणे शहर**

**गहाळ झालेल्या महागडया मोबाईलचा तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे लावला शोध**

श्वेता राणी व सुबोधकुमार मांझी, रा.मुगल गार्डन, लेन नं.५, कोरेगाव पार्क यांचा दि.२०/०१/२०१९ रोजी हॉटेल डेली, लेन नं.७, कोरेगाव पार्क येथून वन प्लस ६ हा मोबाईल ४५ हजार रूपये किंमतीचा पडून गहाळ झाल्याने त्याबाबत त्यांनी ऑनलाईन प्रॉपर्टी मिसींग एल आर नं.२२४६६०२०१८ अन्वये दि.२१/०१/२०१९ रोजी नोंद केली.

नमूद वन प्लस ६ या मोबाईल संदर्भात दिलेल्या मिसींगची माहिती पोलीस कर्मचारी विनोद साळुंखे कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन, पुणे यांनी घेवून सदर मोबाईलचा आयएमईआय नंबर ट्रेसिंगला लावला. सदर तांत्रिक विश्लेषणावरून सदरचा मोबाईल हा इसम नामे हबीबुल इब्राहिम रहेमान, रा.येरवडा, पुणे यांचे ताब्यात असल्याचे समजून आल्याने, त्यांचेशी संपर्क करून मोबाईल ताब्यात घेवून, तो श्वेता राणी यांना परत केलेला आहे. अशा प्रकारे श्री.मदन बहाद्दरपुरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोरेगाव पार्क पोलीस ठाणे, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी विनोद साळुंखे यांनी तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे मोबाईल शोधून काढलेला आहे. मोबाईल परत मिळाल्याने तक्रारदार यांनी पोलीसांचे आभार मानले.

(मदन बहाद्दरपुरे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
कोरेगाव पार्क पो.स्टे.पुणे